तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, दोडामार्ग
तालुका दोडामार्ग जिल्हा सिंधुदुर्ग
दूरध्वनी क्रमांक (०२३६३-२५६५१८) Mail Id - tahsildodamarg@gmail.com

दि. १४.१०.२०२२

क्र./जबाबी/भोगवटा प्रमाणपत्र/एसआर- ०१/२०२२

वाचले - १. श्री. भारत ठाकरान, तर्फे कु.मु. श्री. सुनिल शंकर गवस, रा. पर्वरी, गोवा यांचे दि. १७.०८.२०२२ व दि. २९.०९.२०२२ रोजीचे अर्जप्रकरण.
२. मंडळ अधिकारी, तळकट, ता. दोडामार्ग यांचा जा.क्र. २७/२०२२, दि - २१.०९.२०२२ व जा.क्र. २७/२०२२, दि - १०.१०.२०२२ रोजीचा चौकशी अहवाल
३. या कार्यालयाकडील आदेश आदेश क्रमांक एनएपी/३४/एस.आर/०५/२०१८, दि. २३.०३.२०१८
४. या कार्यालयाकडील दुरुस्ती आदेश क्र. एनएपी/३४/बाधपर/एसआर/०३/२०२०, दि. ११.०८.२०२०
५. या कार्यालयाकडील दि. ११.१०.२०२२ रोजीची मंजूर टिपणी.

अपेंडिक्स एफ (उपविधी क्र. १३)

## भोगवटा प्रमाणपत्र

मौजे वझरे, ता. दोडामार्ग येथील स.नं. १५५, हि.नं. ३, क्षेत्र १.४५.०, पो.ख. ०.१०.० हे.आर आकार ०.४६ ही मिळकत श्री. भारत ठाकरान, रा. पर्वरी, गोवा यांचे नावे असून सदरील मिळकतीत निवासी प्रयोजनाकरिता या कार्यालयाकडील वाचले क्र. ३ व ४ नुसार अकृषिक परवानगी घेणेत आलेली आहे. वरील परवानगी आदेशा प्रमाणे त्यांनी इमारतीचे बांधकाम Shri. Rupesh N. Tawate, Consulting Lic. Civil Engineer, At & Po - Pawashi, Tal - Kudal, Dist - Sindhudurg वास्तु विशारद यांच्या देखरेखीखाली पूर्ण केले असल्याचे दि. २९.०९.२०२२ रोजीचे प्रमाणपत्र व मंडळ अधिकारी, तळकट यांचेकडील वाचले क्र. २ अन्वये प्राप्त अहवालास अनुसरून, सदरहू इमारतीचे "भोगवटा प्रमाणपत्र" खालील अटी व शर्तीस अधिन राहून देणेत येत आहे.

अटी व शर्ती -

१. सदर पूर्णत्वाचा दाखला या कार्यालयाकडील अकृषीक परवानगीला अधीन राहून उपरोक्त भूखंडामधील इमारत क्र. १,२,३,४,५,६,७,८,१०,११,१२,१३ पूरताच मर्यादित राहिल.
२. स्वतःचे व इतरांचे जलस्त्रोत बाधीत झाल्यास संबंधीत जबाबदार राहतील तसेच सांडपाण्याच्या निच-याबाबत खात्री संबंधीतानी करून घ्यावयाची आहे. त्याबाबत सदर इमारतीमधील अन्य सदनिकाधारक यांच्या होणा-या तक्रारीबाबत त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीतांची राहील.
३. आवश्यक त्या खात्यांची परवानगी संबंधीतानी घ्यावयाची आहे.
४. जागेसंबंधी काही वाद निर्माण झाल्यास सर्व जबाबदारी संबंधीतांची राहिल. तसेच सदरचा वाद आपण परस्पर योग्य त्या न्यायालयात सोडविणेत यावा.
५. मंजूर नकाशात रस्ता रुंदिकरणाने बाधीत होणारे क्षेत्र, संबंधीतानी स्थानिक प्राधीकरण मागणी करील त्यावेळी विनातक्रार, विनामोबदला त्यांचेकडे वर्ग करणे कायदयाने बंधनकारक राहिल.
६. इमारतीमधील सोकपीट/ सांडपाणी संयंत्रामधुन बाहेर जाणा-या पाण्यापासून इमारतीमधील व आजूबाजूचे रहिवाशी यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची संबंधीतानी काळजी घेणेची आहे.